**प्रेस नोट ०७/०५/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**

**एस टी स्टँन्ड परिसरात मिळुन आलेल्या अल्पवयीन मुलास नातेवाईकाचे ताब्यात दिले बाबत.**

दि. ०५/०५/२०१९ रोजी एक अल्पवयीन मुलगा शिवाजीनगर एस टी स्टँन्ड परिसरामध्ये फिरत असल्याचे तेथील स्थानिक लोकांनी कळविल्याने सदर मुलास सपोनि भोईटे यांनी ताब्यात घेवुन शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे आणले त्यास त्याचा नाव पत्ता विचारला असता सदर मुलाचे वय १६ वर्षे असुन तो इंद्रायणीनगर माजलगाव बीड येथे राहवयास असल्याचे सांगितले त्यास पुणे येथे येणेबाबत विचारले असता त्याने त्याचे वडिल गजेंद्र तोडके यास दारुचे व्यसन असुन त्यावरुन आई वडिलांमध्ये भांडणे चालु असल्याने त्यांच्या या रोजच्या भांडणाला वैतागुन दि. ०४/०४/२०१९ रोजी रात्रौ २१.०० वा माजलगाव पुणे एस टी ने प्रवास करुन दि. ०५/०५/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता शिवाजीनगर बस स्टँन्ड पुणे येथे आल्याचे सांगितले आहे. सपोनि भोईटे यांनी नातेवाईकांचे मोबाईल क्रमांकाबाबत विचारणा केली असता त्याने त्याचा मामा नामे शेखर साळवे रा. माजलगाव यांचा संपर्क क्रमांक ८३९०८०२८२८ हा दिल्याने शेखर साळवे यांच्याशी संपर्क साधुन मुलगा शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे असल्याचे कळविले त्यावेळी त्यांनी पुणे येथे राहणारे त्यांचे नातेवाईक नामे हिराजी अर्जुन जाधव रा. वाघोली फाटा पुणे यांना शिवाजीनगर पो स्टे येथे पाठवित असल्याचे सांगुन त्यांचे ताब्यात मुलास देण्यास सांगितले व दि. ०६/०५/२०१९ रोजी स्वता सदर मुलास घेवुन जाणेकरीता येत असल्याचे सांगितले त्याप्रमाणे हिराजी अर्जुन जाधव रा. वाघोली फाटा पुणे हे शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे आल्यानंतर मिळुन आलेल्या अल्पवयीन मुलास सुरक्षीत त्यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो स्टे पुणे, बापु शिंदे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि रणजित भोईटे, पो शि सागर कोंडे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**